<u>नियमित दिवाणी दावा क्र. ८०/२०२३ मध्ये निशाणी क्र. १ वर आदेश.</u>

रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. ४ ने या प्रकरणात त्यांचे म्हणणे/लेखी कैफीयत दाखल न केल्याने प्रस्तुतचा दावा प्रतिवादी क्र. ४ च्या लेखी कैफीयतीशिवाय पुढे चालविण्याबाबत निशाणी क्र. १ वर दिनांक ०६/०७/२०२३ रोजी आदेश पारीत केला आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र. ४ तर्फे त्यांच्याविरुद्धचा दिनांक ०६/०७/२०२३ रोजीचा विना लेखी कैफीयत प्रकरण चालविण्याबाबतचा निशाणी क्र. १ वरील आदेश रद्द करुन निशाणी क्र. ५ च्या अर्जाचे म्हणणे दाखल करुन घेण्यासाठी निशाणी क्र. ३४ कडे अर्ज दाखल केला आहे. निशाणी क्र. ३४ कडील अर्जावरील आदेशानुसार प्रतिवादी क्र. ४ ने वादीला रुपये ३००/– इतकी खर्चाची रक्कम देण्याच्या अटीवर प्रतिवादी क्र. ४ विरुद्ध पारीत केलेला प्रकरण विना लेखी कैफीयत चालविण्याबाबतचा आदेश रद्द करण्यात आला आहे. परंतु निशाणी क्र. ३४ कडील अर्जावर पारीत केलेल्या आदेशाप्रमाणे प्रतिवादी क्र. ४ ने वादीला आजपर्यंत रुपये ३००/– इतकी खर्चाची रक्कम दिल्याचे अथवा सदरची खर्चाची रक्कम न्यायालयात जमा केल्याचे दिसून येत नाही. प्रतिवादी क्र. ४ ने निशाणी क्र. ३४ कडील अर्जावरील आदेशाप्रमाणे खर्चाची रक्कम वादीला दिली नसल्याने अथवा न्यायालयात जमा केली नसल्याने प्रतिवादी क्र. ४ विरुद्ध निशाणी क्र. १ वर दिनांक ०६/०७/२०२३ रोजी पारीत केलेला प्रकरण विना कैफीयत/विना म्हणणे चालविण्याबाबतचा आदेश कायम करण्यात येतो. त्यानुसार प्रस्तुतचे प्रकरण निशाणी क्र. ५ कडील अर्जाच्या युक्तीवादाकरीता निश्चित करण्यात येते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2024.07.10 15:10:23 +0530

दिनांकः– १०/०७/२०२४ (पां. लिं. घुले)
ठिकाणः– कराड. २रे सह दि.न्या. व. स्तर, कराड.